साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २० मे २०२४ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशु प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## पाऊस आला भारताच्या वेशीवर; ३१ मे ला केरळात तर ८ जूनपर्यंत महाराष्ट्रात होणार दाखल

मुंबई, (बातमीदार):-

कडक उन, मोठे तापमान यामुळे हैराण झालेल्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी असून मान्सून काही दिवस अगोदरच भारताच्या वेशीवर आला असून येत्या ३१ मे पर्यंत तो केरळ मध्ये दाखल होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

यंदा समाधानकारक पाऊस होईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तविल्याने दुष्काळाने होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना आनंद झाला आहे. यावर्षी पावसावर 'एलनिनो'चा प्रभाव कमी होवून 'लानिनो' ही वातावरणीय स्थिती अधिक प्रभावी होत आहे. त्यामुळे पाउस चांगला होण्याचा अंदाज वर्तविला गेला आहे. ऑगस्ट ते सप्टेंबरपर्यंत या वातावरणाचा प्रभाव टिकून राहणार असल्याने पाऊस समाधानकारक होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे. सध्या देशात सर्वत्र मोठे तापमान व उष्णतेची तीव्र लाट असून अनेक भागात



तापमानाने विक्रम केला आहे. यामुळे आबालवृद्धांसह इतर सजीवांवर गंभीर परिणाम झाला आहे. जलस्त्रोतही कोरडे पडत आहेत. यामुळे अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. यंदा दहा दिवस अगोदरच मान्सून भारतात दाखल होत आहे. नैऋत्य मोसमी वारे आरबी समुद्रात पुढे सरकण्यासाठी अनुकूल वातावरण असून अंदमान निकोबार बेटावर मान्सून वाऱ्याचे आगमन झाले आहे. त्यामुळे येत्या ३१ मे पर्यंत मोसमी वारे केरळ मध्ये दाखल होवून पावसाला सुरूवात होणार असल्याचे सांगण्यात आले. केरळमध्ये पाउस दाखल झाल्यानंतर आठवडाभरात सिंधुदुर्ग जिल्ह्यातून हा पाऊस महाराष्ट्रात दाखल होणार असून ८ जूनच्या आसपास मान्सून आपल्याकडे दाखल होणार असल्याचा अंदाज वर्तविला गेला आहे. ***

## लोकसभा निवडणुकीसाठी पाचव्या टप्प्यातील मतदान सोमवारी होणार

मुंबई, (बातमीदार):-

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातील अखेरच्या टप्प्यात महाराष्ट्रात १३ लोकसभा मतदार संघात मतदान होणार असून या मतदानाची तयारी पूर्ण झाली आहे.

महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, दिंडोरी, ठाणे, इशान्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर मुंबई, वायेव्य मुंबई, उत्तर मध्य मुंबई, कल्याण, भिवंडी, पालघर या १३ लोकसभा मतदार संघात सोमवारी (ता.२०) सकाळी सात वाजता मतदानाला सुरूवात होणार आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान चालणार असून एकूण दोन कोटी ४६ हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १३ लोकसभेच्या जागेसाठी एकूण २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. या १३ मतदार संघात २४ हजार ५७९ मतदान केंद्र आहेत. या मतदानाची तयारी पूर्ण झाली असून अगोदरच्या चार टप्प्यापेक्षा पाचव्या टप्प्यात मतदानाचा टक्का वाढावा म्हणून प्रशासनाकडून जोरदार प्रयत्न केले जात आहेत. ***

## उभ्या असलेल्या गाडीच्या काचा फोडल्या; एकाविरुद्ध गुन्हा

परळी वैजनाथ, (बातमीदार):-

शहरातील पद्मावती गल्लीतील हनुमान मंदिरासमार उभी करण्याच आलेल्या चारचाकी गाडीच्या काचा फोडुन नुकसान केल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील पद्मावती गल्ली येथील रहिवाशी राहुल रामचरण केंद्रे यांनी आपली क्रेटा एस.एक्स.कंपनीची गाडी क्र.एम.एच.२५ एडी २५९९ ही दि. १८ मे रोजी हनुमान मंदिरासमोर उभी केली असता रात्री आठ वाजता गाडीसमोर कुणीतरी येवून तलवारीने हल्ला करत असल्याचे कळाल्यानंतर केंद्रे हे गाडीजवळ गेले असता आकाश निंबाळकर हा गाडीच्या बोनटवर मारुन, काच फोडत होता. त्यास कारण विचारले असता तेथून पळुन गेला. या प्रकरणी आकाश निंबाळकर यांच्याविरुद्ध संभाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

***

## तलवारीने केक कापणे अंगलट; सहा जणांवर गुन्हा दाखल

दिंद्रुड (बातमीदार):- वाढदिवसाच्या दिवशी तलवारीने केक कापणे एका तरुणाच्या आणि त्याच्या मित्रांच्या अंगलट आले. शस्त्र दाखवून दहशत पसरवल्याप्रकरणी दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. माजलगाव तालुक्यातील मोगरा येथे ही घटना घडली. अतुल किशन पांढरपोटे या माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील तरुणाचा दोन दिवसांपूर्वी वाढदिवस होता. वाढदिवसाच्या निमित्ताने त्याने मित्रांसह केक कापून वाढदिवस साजरा केला. मात्र, केक कापण्यासाठी त्याने तलवारीचा वापर केला. याबाबतचा फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावरही टाकला. यानंतर दिंद्रुड पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी श्रीडोळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अतुल किशन पांढरपोटे, महादेव पांढरपोटे, अभिषेक पांढरपोटे, नागेश पांढरपोटे, भैय्या पांढरपोटे आणि ज्ञानेश्वर पांढरपोटे (सर्व रा. मोगरा, ता. माजलगाव) यांच्याविरोधात दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा नंबर ९४/२०२४ कलम ४/२५ आर्मी ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीने गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त केले असून आरोपीस अटक करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. **

## कीड रोग व्यवस्थापन पुस्तकेत सुधारणा कळविण्याचे आवाहन

बीड, (जिमाका):- कृषी विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास शिफारशी ही पुस्तिका तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर पुस्तिकेमध्ये भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकांचे पेरणीपासून काढणी पर्यंतचे लागवड तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन या विषयी

(उर्वरित पान ४ वर)

## १२ वी परीक्षेचा मंगळवारी निकाल

मुंबई, (बातमीदार):-

गेल्या फेब्रुवारी/मार्च मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या १२ वी परीक्षेचा निकाल मंगळवारी (दि.२१) दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे.

मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल जाहीर होणार असून यंदा या परीक्षेसाठी राज्यभरातून पंधरा लाख तेरा हजारावर विद्यार्थी बसले होते. विद्यार्थ्यांना संकेतस्थळावरुन आपल्या निकालाची प्रिंटही काढून घेता येईल. अशी माहिती मंडळाच्या वतीने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात देण्यात आली आहे. ***

# राजस्थानी मल्टीस्टेट मुख्य शाखा कार्यालय सिल

## गुन्हे दाखल करा या मागणीसाठी परळी येथील ठेवीदार आक्रमक

परळी वैजनाथ, (बातमीदार):-

परळी येथील राजस्थानी मल्टीस्टेट को ऑप. क्रेडिट सोसायटी च्या मुख्य शाखेस लातुर येथील पोलीसांनी सील ठोकले आहेत. तर चेअरमन व संचालक मंडळावर फसवणुकीचे गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी परळी येथील ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने शनिवारी (ता.१८) शहर पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांची भेट घेतली.

फसवणूक प्रकरणी दि.२५ एप्रिल रोजी दाखल केलेल्या तक्रारी अर्जावरून संचालक मंडळावर कारवाई करावी असा आग्रह ठेवीदारांनी धरला आहे.

येथील राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन व संचालक मंडळांनी मुदतीनंतर ही ठेवीदारांचे पैसे परत केले नाहीत. गेल्या आठ महिन्यापासून राजस्थानी मल्टीस्टेटच्या परळीतील मुख्य शाखेसह पाच शाखा बंद आहेत. चेअरमन व संचालक मंडळ गायब झाले आहे. त्यांचा मोबाईल ही बंद येत आहे. त्यामुळे ठेवीदारांनी येथील तहसील कार्यालयासमोर काही दिवसांपूर्वी उपोषण केले तसेच राजस्थानी मल्टीस्टेटच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली परंतु अद्यापही ठेवीदारांना पैसे मिळाले नसल्याने ठेविदार संतप्त झाले आहेत.

**तपास करू**

या प्रकरणाचा तपास करून संचालकाविरुद्ध पुढील कारवाई करण्यात येईल.

– **राजकुमार ससाणे,** सहाय्यक पोलीस निरीक्षक, परळी

**अनेक ठेवीदार अडचणीत**

विश्वासाने पैसे गुंतवले असून मुदतीनंतरही पैसे परत मिळाले नाहीत. चेअरमन व संचालक भेटत नाहीत ते परळीतून निघून गेले आहेत. त्यामुळे दाद कुणाकडे मागावी असा प्रश्न पडला आहे. अनेक ठेवीदारांना विविध आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे.

– **रमेश कोमवार,** ठेवीदार, परळी

शनिवारी राजस्थानी मल्टीस्टेटच्या संचालका विरोधात गुन्हे दाखल करावेत अशी मागणी परळीचे पोलीस निरीक्षकाकडे केली आहे. शुक्रवारी (ता.१७) लातूर येथील आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकाऱ्यांनी राजस्थानी मल्टीस्टेटच्या मोंढा भागातील मुख्य शाखेला सिल ठोकले आहे. तसेच अरुणोदय मार्केट मधील शाखेला भेट दिली आहे अशी माहिती ठेवीदार सेवकराम जाधव यांनी शनिवारी दिली. लातूर पोलीस ठाण्यातही लातूर येथील एका ठेवीदारांनी संचालक मंडळाच्या विरोधात तक्रार दाखल केल्यावरून गुन्हे दाखल केले आहेत.

या गुन्ह्याच्या तपासासाठी लातूर आर्थिक शाखेचे पोलीस परळीत येऊन गेले. दरम्यान शनिवारी (ता.१८) सकाळी परळी येतील ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने राजस्थानी मल्टीस्टेटच्या संचालक मंडळ विरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी शहरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार ससाणे यांची भेट घेतली.

***

# मतदान यंत्रांवर २४ तास सी.सी.टी.व्ही.कॅमेऱ्यातून निगराणी

बीड (जिमाका):- लोकसभा निवडणुकीसाठी काल सोमवारी १३ मे रोजी मतदान झाल्यानंतर आज सकाळपर्यंत ३९ बीड लोकसभा मतदारसंघातील सहा ही विधानसभा क्षेत्रातील मतयंत्र बीड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात स्ट्राँगरूममध्ये पोहचले आहेत. निवडणूक निरीक्षक, जिल्हाधिकारी, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्रॉंग रूम सिलबंद करण्यात आले. लोकसभा निवडणूक यशस्वी.पार पाडण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी समस्त मतदार, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, प्रतिनिधींचे आभार मानले आहेत.

बीड लोकसभा मतदारसंघासह राज्यातील ११ मतदार संघात काल मतदान पार पडले. बीडमध्ये ४१ उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक आयोगाकडून आलेल्या आकडेवारीनुसार बीडमध्ये ७०.९२ %टक्के मतदान झाले आहे. सर्वाधिक मतदान आष्टी विधानसभा क्षेत्रात झाले आहे. ४ जून रोजी बीडच्या खासदाराची निवड होणार असून शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये ही मतमोजणी होणार आहे.

**स्ट्रॉंग रूमला कडक सुरक्षा-** शासकीय तंत्रनिकेतन मध्ये ज्या ठिकाणी मतयंत्र ठेवलेली आहेत. त्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त करण्यात आला आहे. या ठिकाणी कोणालाही प्रवेश नाही. त्रीस्तरीय सुरक्षा व्यवस्था या ठिकाणी कार्यरत आहे. यामध्ये बाहेरील सुरक्षा व्यवस्था, स्थानिक पोलीस बघतात. मधल्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये राज्य राखीव पोलीस दलाचे कर्मचारी आहेत. तर ज्या ठिकाणी मतपेट्या सीलबंद केल्या आहेत. त्या ठिकाणी केंद्रीय राखीव दलाचे सशस्त्र जवान २४ तास कडा पहारा ठेवून आहेत. ही सुरक्षा व्यवस्था ४ जून पर्यंत राहणार आहे. ३ जूनला मतमोजणीचे मॉक ड्रील होईल. निवडणूक निरीक्षक अजीमुल यांच्या मुख्य उपस्थितीत स्ट्रॉंग रूम सील करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यासाठी शासकीय तंत्रनिकेतन परिसरात जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे , अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिव कुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, सहा विधानसभाक्षेत्राचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ***




बीड :- जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत झाल्याबद्दल बीड लोकसभा मतदार संघासाठी नेमलेले निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

# परळीच्या 'नागनाथअप्पा हालगे अभियांत्रिकी'ला दणका

### तीन वर्षांसाठी परीक्षा केंद्र नाही; प्राचार्य-प्राध्यपकांना परीक्षेवर निर्बंध

छत्रपती संभाजीनगर (बातमीदार):- परळी येथील नागनाथअप्पा हालगे अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मार्च-एप्रिल २०२४ मधील पदवी परीक्षेच्या दरम्यान झालेले गैरप्रकार, प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी विद्यापीठाने कारवाई करत दणका दिला. या महाविद्यालयास पुढील तीन वर्षे कोणत्याही अभ्यासक्रमाचे परीक्षा केंद्र देण्यात येणार नाही. तसेच प्राचार्य, प्राध्यापकांनाही पुढील तीन वर्षे परीक्षेच्या कामापासून प्रतिबंधित करण्यात येत असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ.भारती गवळी यांनी काढलेल्या पत्रात म्हटले आहे. मार्च-एप्रिल २०२४ च्या पदवी परीक्षेदरम्यान, या महाविद्यालयाच्या केंद्रावर प्रश्नपत्रिका फुटीसारखा गैरप्रकार झाला होता. या प्रकरणी कुलगुरुंनी दखल घेत तत्काळ परीक्षा केंद्र रद्द केले होते.

या गैरप्रकाराची सखोल चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने १५ एप्रिल रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत अहवाल सादर केला. समितीने केलेल्या शिफारशीस मान्यता दिली असून त्यानूसार पुढील तीन वर्षांसाठी महाविद्यालयास परीक्षा केंद्र देता येणार नाही व प्राचार्य, प्राध्यापकांनाही त्याच कालावधीपर्यंत परीक्षेच्या कामापासून प्रतिबंधित करण्यात येत असल्याचे विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या पत्रात म्हटले आहे. दरम्यान, परळी येथील प्रा.डॉ.दशरथ रोडे यांनाही परीक्षेच्या कामातून तीन वर्षांसाठी प्रतिबंधित करण्यात आले आहे. हालगे अभियांत्रिकी महाविद्यालयातील उपरोक्त परीक्षेच्या दरम्यान डॉ.रोडे यांची सहकेंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. **

# माता कौशल्यादेवी लोहिया यांच्या गौरवार्थ परळीत त्रिदिनात्मक ''मातृवंदना'' समारंभ

परळी वैजनाथ, (बातमीदार):-

शहरातील ज्येष्ठ नागरिक व दानशूर आदर्श माता श्रीमती कौशल्यादेवी रामपालजी लोहिया यांच्या ९१ व्या वर्षपूर्तीनिमित्त येत्या २४, २५ व २६ मे रोजी भव्य स्वरूपात ''मातृवंदना'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अक्षदा मंगल कार्यालयात संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमासाठी हरिद्वार येथील पतंजली विद्यापीठाचे प्रति- कुलगुरू व प्रसिद्ध वैदिक विद्वान प्रो. डॉ. महावीरजी आचार्य व दिल्ली येथील प्रसिद्ध भजनगायिका श्रीमती अमृता शास्त्री यांची उपस्थिती लाभणार असून त्यांचे दररोज आध्यात्मिक, धार्मिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय विषयांवर अमूल्य असे मार्गदर्शन लाभणार आहे.

तिन्ही दिवशी दररोज सकाळी ९ ते १ वा. व संध्याकाळी ५ ते ९ वा. यजुर्वेद पारायण यज्ञ, भजन संगीत व विविध मौलिक विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने संपन्न होतील . तिसऱ्या दिवशी सकाळी मान्यवर



विद्वान, साधू महात्मे,संन्यासी व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत माता कौशल्यादेवी लोहिया यांच्या कृतार्थ जीवनाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा '' मातृ वंदना'' सोहळा होईल. यात आयुष्कामेष्टी यज्ञ, ग्रंथतुला, सत्कार व इतर कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत. तरी या समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाच्या संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. ***

## शेतकऱ्यांनी १ जून पूर्वी कापसाची लागवड करु नये

बीड, (जिमाका):- सध्या अवकाळी पाऊस पडत असल्याने कापूस पिकावरील शेंदरी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी कापसाची लागवड ही अशा अवकाळी पावसावर करणे योग्य होणार नाही. कापसाची लागवड ही कोणत्याही परिस्थितीत १ जून पुर्वी करण्यात येऊ नये, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. १ जून पूर्वी लागवड केल्यास शेंदरी बोंडअळीचे जीवनचक्र खंडीत होत नाही व अळीचा प्रादुर्भाव अधिक वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे येणारे उत्पादन गुणवत्तेत कमी पडते तसेच पिक उत्पादनाचा खर्च अधिक येतो. अशा मालाला दरही कमी मिळतो त्यामुळे पूर्व हंगामी लागवड किफायतशीर राहत नाही. शेतक-यांनी १ जून पूर्वी कापसाची लागवड करु नये.**

(पान १ वरुन)...**कीड रोग व्यवस्थापन**

माहिती देण्यात आली आहे. सदर पुस्तिकेच्या Draft चा क्यु.आर.कोड सोबत देण्यात येत आहे. या पुस्तिकेमध्ये काही सुधारणा तसेच अतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास कृषी आयुक्तालयाच्या ddinfor@gmail.com या मेलवर कळविण्यात यावे .असे कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुण्याचे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. **

# उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा-निवासी उपजिल्हाधिकारी यांचे आवाहन

बीड, (जि. मा. का.) :- आगामी दिवसामध्ये उष्णतेची लाट जाणवू शकते. उष्माघात होऊ नये यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर दयावा. उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने रुग्णाच्या शरीराचे तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करून घ्यावेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. तसेच उष्माघात उपचारासाठी शासकीय रूग्णालयांत सज्जता ठेवण्याच्या सुचनाही जिल्हा रुग्णालय प्रशासनाला दिल्या आहेत.

**उष्माघात होण्याची कारणे:-** उन्हामध्ये शारीरिक श्रमाचे, मजूरीचे कामे फार वेळ करणे, कारखान्याचे बॉयलर रूममध्येकामकरणे, काचकारखान्यातीलकामकरणे, जास्त तापमानाच्या खोलीतकामकरणे, घट्ट कपडयांचा वापर करणे, उष्णतशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येणे.

**उष्माघाताची लक्षणे:-** शरीरास घाम सुटणे, तहान लागणे, शरीर शुष्कहोणे, थकवा येणे, ताप येणे (१०२ पेक्षा जास्त) त्वचा कोरडी पडणे, भुक न लागणे, चक्कर येणे, निरूत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैन, अस्वस्थ, बेशुध्द अवस्था उलटी इत्यादी, होणे.

**जोखीमेचा गट :-** वय -५ वर्षापेक्षा कमी व ६५ वर्षापेक्षा जास्त, कष्टाची सवय नसणारे लोक, धुम्रपान, मदयपान करणारे आणि कॉफी पिणारे व्यक्ती, मुत्रपिंड, हृद्रोग, यकृत, त्वचा विकार, लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण, Diuretics, anti allergic, tranqilizers, stimu-lants etc. या औषधींचे सेवन सुरु असलेले रुग्ण, जास्त तापमान, अति आर्द्रता, वातुनूकलनाचा अभाव, तंग कपडे, शेतकाम, कारखान्यातीलकाम ऊन आणि उष्णतेशी संबधीत व्यवसाय करणा-या व्यक्ती.

**प्रतिबंधात्मक उपाय:-** वाढत्या तापमानाच्या वेळेत कष्टाचीकामे टाळणे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमान असताना करावी, उष्णता शोषून घेणारे कपडे उदा. काळया किंवा भडक रंगाचे कपडे वापरु नयेत. सैल व उष्णता परावर्तित करणारे पांढ-या रंगाचे कपडे वापरावेत. जलसंजीवनीचा वापर करावा, पाणी भरपूर प्यावे. सरबत प्यावे. उन्हामध्ये काम टाळावे व सावलीत विश्रांती घ्यावी. शक्यतो उन्हात




फिरण्याचे टाळावे. आवश्यक कामे असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे. किंवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्याअगोदर जेवण करावे, रिकाम्या पोटी उन्हात जावू नये, कान व डोक्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक आहे. डोक्याभोवती पांढरा रुमाल गुंडाळावा. गॉगल्स व हेल्मेट वापरावी. वृध्दांना व बालकांना उन्हात फिरु देऊ नये.

**उपचार :-** रुग्णास हवेशीर खालीत ठेवणे, खोलीत पंखे, कुलर ठेवावेत. शक्यतो वातानुकुलीत खोलीत ठेवावेत., रुग्णाच्या शरिराचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रोग्याला बर्फाच्या पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवावे. आईसपॅक लावावेत, ओआरएससोल्युशन दयावे.

उन्हाळयामुळे उष्माघाताचे रुग्णावर उपाययोजनाकरणेसाठी व मृत्यू टाळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी, कुटीर रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांनी आवश्यकती सर्व तयारी ठेवणेबाबत कळविण्यात आलेले आहे. (उदा. हवेशीर खोली, पुरेसा औषधी, सलाईनचा साठा, खोलीत पंखे, कुलर इ. सुस्थितीत ठेवावी) यांचीसोय करावी.

फ्रीजच्या उपलब्धतेसाठी फ्रिज सुस्थितीत असणे आवश्यक आहे. उष्माघाताची कारणे लक्षणे प्राथमिक उपचार त्याचप्रमाणे उष्माघात होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी याची माहिती आरोग्य शिक्षणाद्वारे प्रचार माध्यमातून दयावी.

**काय करावे -** तहान नसलीतरी भरपूर पाणी / सरबत प्यावे, हवा खेळती राहण्याकरीता पंख्याचा वापर करावा.

सैल व सौम्य रंगाचे सुती कपडे वापरावे. सावलीत थांबणे, हळुवार चालावे, टोपी, फेटा चष्मा वापरणे, मजुर वर्गास वारंवार विश्रांती घेवु दयावी, उन्हातुन आल्यावर चेह-यावर आलेकापड ठेवावे.

**काय टाळावे:-** मद्य,सोडा, कॉफी, अतीगार पाणी इ. पिणे, गरज नसतांना उन्हात बाहेर फिरणे, तंग, व गडदकपडे वापरणे, सवय आहे म्हणून उन्हात निघणे, अति व्यायाम करणे, बंद कार मध्ये राहणे, अति शारिरिककष्टाचेकामेकरणे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२.०० ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी.असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. ***

संपादकीय...

# खेळ सायंकाळचा...!

**-० सुविचार ०-**

जसे करावे तसे भरावे..!

सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या बीड लोकसभेच्या निवडणुकीत यंदा चांगले मतदान झाले. लोकसभेच्या आजपर्यंतच्या सर्व निवडणुकीचे रेकॉर्ड यावेळी झालेल्या मतदानाने मोडीत काढले. यामुळे यंदा वाढलेल्या मतदानाची राजकीय गोटाबरोबरच सर्वसामान्य नागरिकांत चर्चा रंगत आहे. या मतदानाबाबत टिका, टिप्पणी, चिंता, नाराजी, राग व्यक्त होत आहे. आरोप, प्रत्यारोपही केले जात आहेत. आजपर्यंत जे कधी घडले नाही ते यावेळी घडले असेही काहीजण स्पष्टपणे बोलून जात आहेत. एकूणच या मतदानाचा वाढलेला टक्का कोणाला धक्का देणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

बीड लोकसभेसाठी या निवडणुकीत ७४ उमेदवारांनी ९९ उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १४ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली. तर १९ अर्ज बाद झाले होते. निवडणूक रिंगणात यावेळी ४१ उमेदवार होते. लोकसभेच्या जिल्ह्यात झालेल्या आजपर्यंतच्या निवडणुकीत निवडणूक रिंगणात उतरलेल्या उमेदवारांची संख्या सर्वाधिक आहे. रिंगणात ४१ उमेदवार उभे असले तरी निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात लढत ही महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारांत झाली. महाराष्ट्रात झालेल्या पहिल्या तीन टप्प्यातील लोकसभेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का घसरल्याने चौथ्या टप्प्यात तो वाढावा म्हणून प्रशासन व निवडणूक यंत्रणेबरोबरच विविध पक्ष, नेते व कार्यकर्त्यांकडूनही मोठे प्रयत्न झाले. त्यामुळे मतदानाचा टक्का आपल्याकडे वाढला आहे.

बीड लोकसभेसाठी २१ लाख ४२ हजार ५४७ एवढे मतदान होते. त्यापैकी १५ लाख १९ हजार ५२३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ७०.९२ टक्के मतदान झाले. जिल्ह्यात सर्वात कमी मतदान बीड विधानसभा मतदार संघात ६६.९ टक्के तर सर्वाधिक मतदान आष्टी विधानसभा मतदार संघात झाले. येथे ७४.७९ टक्के मतदान झाले. बीड जिल्ह्यातील बीड वगळता इतर पाच विधानसभा मतदार संघात सत्तर टक्क्यांवर मतदान झाले आहे. परळी विधानसभा मतदार संघात ३ लाख २६ हजार ३७४ एवढे मतदार असून त्यापैकी २ लाख ३२ हजार ७३८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी येथे ७१.३१ एवढी आहे. या मतदार संघात सकाळी मतदान कासव गतीने सुरू झाले. आपल्याकडेही मताचा टक्का घसरतो की काय असे एकूण चित्र होते. सकाळी अकरा पर्यंत केवळ १८.७७ टक्केच मतदारांनी मतदान केले होते. मतदान संपायला एक तास कमी असताना म्हणजे सायंकाळी पाच वाजेपर्यंत परळी मतदार संघात ६०.१८ टक्के मतदान झाले होते. हीच स्थिती जिल्ह्यातील इतर विधानसभा मतदार संघात होती. पाच वाजेपर्यंत जिल्ह्यात ५८.२१ टक्के मतदान झाले होते. आष्टी वगळता इतर पाच मतदार संघात ५० ते ६० टक्के मतदान सायंकाळी पाच पर्यंत झाले होते. त्यामुळे ६५ टक्क्याच्या जवळपास मतदान होईल असा अंदाज बांधला जात होता. परंतु पाच नंतर काय जादू झाली हे कोणालाच कळले नाही आणि मताचा टक्का एकदमच वाढला. केवळ एका तासात म्हणजे सायंकाळी पाच ते सहा दरम्यान मतदान दहा ते तेरा, चौदा टक्के अचानक कसे वाढले? सायंकाळी मतदान वाढण्याच्या या खेळाची चर्चा जोरदार सुरू आहे. मतदानाचा टक्का सायंकाळी वाढल्याने कुणी खुष आहे तर कुणी चिंता करतो आहे, कुणी आम्ही जादूची कांडी फिरवली असे अभिमानाने सांगतो आहे. हा खेळा होताना 'हम सब एक है' हे चित्र अनेक ठिकाणी पहायला मिळाले असे काही सांगतात तर या खेळाला विरोध करणारेच कुणी कसे नव्हते? शासकीय यंत्रणा काय करत होती? असे काही विचारताना दिसतात. एकूणच मतदार संघात काही ठिकाणी झालेला हा प्रकार लोकशाही बळकट करणारा की लोकशाहीवरुन सर्वसामान्यांचा विश्वास कमी करणारा आहे? असा सवाल अनेकांना पडला. जे व्हायलय ते चांगले नाही असे अनेकजण म्हणताना दिसत होते. सायंकाळी वाढलेला मताचा टक्का कोणाचा फायदा करणारा आहे? याचीही उत्सुकता आहे. हे काहीही असले तरी या लोकसभा निवडणुकीत निवडणूक रिंगणात असलेल्या ४१ उमेदवारांचे भवितव्य आता मतदान यंत्रात बंद झाले आहे. येत्या ४ जून पर्यंत निकालाची वाट आपल्याला पहावी लागणार आहे. ***

# देशातील पहिली निवडणूक...

मुंबई : १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची धुरा पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हाती सोपवण्यात आली. मात्र, भारतातील पहिली निवडणूक पार पडली ती १९५१-५२ या दोन वर्षांमध्ये! याआधी कधीच या प्रक्रियेला नुकताच लोकशाही-संघराज्य पद्धतीने आकारास आलेला 'भारत' नावाचा देश सामोरा गेलेला नव्हता, त्यामुळे या निवडणुकीची प्रक्रिया दीर्घकाळ चालली. भारताच्या घटनेमधील प्रास्ताविकेमध्ये हे लोकशाही गणराज्य असल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे आता इथल्या नागरिकांच्या हातून या देशाची सत्ता उभी राहिली पाहिजे, या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल म्हणजे ही निवडणूक होती. या निवडणुकीमध्ये ४८९ लोकसभेच्या जागा, तर ३,२८३ अशा विधानसभेच्या एकूण जागा होत्या. अर्थातच, स्वातंत्र्यासाठी लढलेला एक मोठा राजकीय पक्ष म्हणून काँग्रेस निवडणुकीच्या या रिंगणात प्रबळ दावेदार होता. मात्र, इतरही अनेक विचारधारांचे पक्ष या राजकीय आखाड्यात उतरले होते. त्यामध्ये जयप्रकाश नारायण यांसारखे मातब्बर नेते असलेला समाजवादी पक्ष, जेबी कृपलाणी यांचा किसान मजदूर प्रजा पक्ष, सध्याच्या भाजपाचे आधीचे रुप असलेला अखिल भारतीय जन संघ, हिंदू महासभा, करपत्री महाराज यांची अखिल भारतीय रामराज्य परिषद आणि त्रिदीब चौधरी यांचा क्रांतीकारी समाजवादी पक्ष, असे काही पक्ष प्रामुख्याने लढत होते. २१ वर्षे आणि त्याहून अधिक वय असलेल्या तब्बल १७६ दशलक्ष मतदारांनी या निवडणुकीमध्ये मतदान केले होते. (१९८९ पासून मतदानासाठीचे वय १८ करण्यात आले.) यापैकी तब्बल ८२ टक्के लोक हे निरक्षर होते. भारताने जेव्हा आपल्या देशातील सर्व प्रौढ नागरिकांना मतांचा अधिकार दिला होता, त्या काळात असा अधिकार देऊ करणारे फारच कमी देश जगाच्या पटलावर अस्तित्वात होते. अगदी अमेरिकेनेही १९६५ साली आपल्या देशातील सर्व प्रौढ नागरिकांना मताचा अधिकार दिला. भारताने मात्र जवळपास दोन शतकांची साम्राज्यवादी सत्ता हुसकावून लावल्यानंतर अवघ्या चार वर्षांनंतरच हा अधिकार आपल्या नागरिकांना दिला. भारतीय निवडणूक आयोगासमोर होती अभूतपूर्व अशी आव्हाने नव्याने आकारास आलेल्या भारतामध्ये निवडणूक आयोगाची स्थापना अद्याप व्हायची होती. २५ जानेवारी १९५० रोजी निवडणूक आयोगाची स्थापना झाली. सुकुमार सेन हे पहिले मुख्य निवडणूक अधिकारी होते. ते भारतीय नागरी सेवेमध्ये कार्यरत होते आणि पश्चिम बंगालचे मुख्य सचिव होते. १९ एप्रिल १९५० रोजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी संसदेमध्ये लोकप्रतिनिधीत्वाचा कायदा आणि भारताचा निवडणूक कायदा मांडला आणि जाहीर केले की, १९५१ च्या वसंत ऋतूमध्ये भारतातील निवडणुका होतील. मात्र, त्याआधी अशा प्रकारची आणि एवढ्या मोठ्या पातळीवर निवडणुकीची प्रक्रिया राबवण्याचा अनुभव ना सरकारला होता, ना भारतातील लोकांना होता. त्यापूर्वी १९३७ मध्ये जी निवडणूक झाली होती, ती भारतातील तत्कालीन नऊ विभागांमध्ये झाली होती. त्यामध्ये आसाम, बिहार, बॉम्बे, मध्य प्रदेश, मद्रास ओरिसा, पंजाब, पश्चिम बंगाल आणि संयुक्त प्रांत असे नऊ विभाग तुलनेने लहान होते. याबाबत माहिती देताना 'गांधींनंतरचा भारत : जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा इतिहास' या पुस्तकामध्ये रामचंद्र गुहा यांनी म्हटले आहे की, एखाद्या भारतीय अधिकाऱ्यावर एवढा मोठा कार्यभार यापूर्वी कधीच पडला नव्हता. त्यांच्यासमोरील आव्हाने प्रचंड मोठी आणि अद्वितीय अशी



होती. एकतर देशातील मतदार दशलक्ष चौरस मैलापर्यंत पसरले होते. दुसरी एक मोठी गमतीशीर समस्या होती. रामचंद्र गुहा सांगतात की, उत्तर प्रदेशमधील अनेक महिला या आपले नाव सांगायच्या नाहीत. त्या मतदार नोंदणी करताना 'अ'ची आई वा 'ब'ची बायको अशा प्रकारे नाव सांगायच्या. ही गोष्ट जेव्हा मुख्य निवडणूक आयुक्तांना कळली तेव्हा ते संतापले आणि त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना त्या महिलांची खरी नावे नोंदवून

**अविनाश देशमुख**
पत्रकार, शेवगांव

आणण्याचे आदेश दिले. सरतेशेवटी जम्मू आणि काश्मीर वगळता संपूर्ण देशातील १७.३२ कोटी मतदारांची नोंदणी करण्यात आली. त्यातील ४५ टक्के महिला होत्या. १९ लाख स्टीलच्या मतपेट्या तयार करण्यासाठी १२ हून अधिक कारखानदारांना कंत्राट देण्यात आले होते. यातील प्रत्येक मतपेटीची किंमत चार ते सहा रुपये ठरवण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीसाठीच्या मतपेट्या हिरव्या रंगाच्या चार छटांमध्ये होत्या, तर विधानसभेसाठीच्या मतपेट्या तपकिरी रंगाच्या चार छटांमध्ये होत्या. रंगीबेरंगी मतपेट्यांचा वापरही निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी १.३२ लाख मतदान केंद्रे आणि १.९६ लाख बूथ उभे करण्यात आले होते. तसेच निवडणुकीसाठी ३.३८ लाख पोलिस कर्मचारीही तैनात होते. ५ ऑगस्ट १९५१ रोजी उदयपूरमध्ये निवडणुकीची पहिली 'मॉक ड्रिल' घेण्यात आली होती. १९५१ मध्ये भारतातील साक्षरतेचा दर हा फक्त १८.३३ टक्के इतका होता. प्रत्येक उमेदवारासाठी एका रंगछटेची मतपेटी ठेवायची अशी ती कल्पना होती. मात्र, ही कल्पना व्यवहार्य ठरली नाही. त्यामुळे मग प्रत्येक उमेदवारासाठी वेगळी मतपेटी ठेवण्यात आली आणि त्यावर त्याचे निवडणुकीचे चिन्ह लावण्यात आले. मतपत्रिकेचा आकार एक रुपयाच्या नोटेच्या आकाराएवढा होता, ती गुलाबी रंगाची होती. तिच्यावर 'भारतीय निवडणूक आयोग' असे लिहिण्यात आले होते. तिच्यावर राज्यांची नावेही होती. मतपत्रिकेवर काळ्या रंगामध्ये अनुक्रमांक होते आणि भारताची राजमुद्रा पांढऱ्या रंगात होती. लोकसभेच्या मतपत्रिकेवर हिरव्या रंगाची उभी रेष होती, तर विधानसभेच्या मतपत्रिकेवर तपकिरी रंगाची रेष होती. मतदारांना मतदान केंद्रातून आपल्या मतपत्रिका घ्यायच्या होत्या आणि त्यांना पसंत असलेल्या उमेदवाराच्या मतपेटीमध्ये त्या टाकायच्या होत्या.

पहिलं मतदान झालं हिमाचल प्रदेशात डिसेंबर १९५१ ते फेब्रुवारी १९५२ या कालावधीमध्ये मतदान पार पडले. मात्र, हिमवृष्टीमुळे हिमाचल प्रदेशबरोबरचा संपर्क तुटू नये म्हणून त्यापूर्वीच म्हणजेच ऑक्टोबर १९५१ मध्ये चिनी आणि पांगी विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान घेण्यात आले होते. १० डिसेंबर १९५१ रोजी देशातील इतर भागांमध्ये मतदानाची प्रक्रिया सुरू झाली. या पहिल्या निवडणुकी मध्ये १,८७४ लोकसभेचे उमेदवार होते, तर वेगवेगळ्या राज्यातील विधानसभेचे १५,३६१ उमेदवार होते. कोट्टायम त्रावणकोर- कोचीन), अलेप्पी (त्रावणकोर-कोचीन) आणि गुडीवाडा (मद्रास) या मतदारसंघामध्ये सर्वात जास्त म्हणजेच ८०.५ टक्के, ७८.१ टक्के आणि ७७.९ टक्के मतदान पार पडले. २ एप्रिल १९५२ रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. या निवडणुकीमध्ये काँग्रेसने ३१८, समाजवादी पक्षाने १२, किसान मजदूर प्रजा पक्षाने ९, भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ८, हिंदू महासभेने ४, अखिल भारतीय रामराज्य परिषद आणि क्रांतिकारी समाजवादी पक्षाने प्रत्येकी तीन जागा जिंकल्या; तर ३७ अपक्ष उमेदवारांनीही बाजी मारली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव झाला होता. या निवडणुकी मध्ये काही विजय अगदीच अपेक्षित होते. मात्र, काही पराभव नक्कीच धक्कादायक होते. जवाहरलाल नेहरु आणि श्यामाप्रसाद मुखर्जी अपेक्षेप्रमाणे जिंकून आले. मात्र, बॉम्बेमधून मोरारजी देसाई आणि राजस्थानमधून जय नारायण व्यास यांचा

(उर्वरित पान ३ वर)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

* वर्ष ०८ * अंक ०२ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २० मे २०२४ * किंमत : २ रू.

# परळीत वाहतुक कोंडी टाळण्यासाठी पी-वन, पी-टू पार्किंगचा प्रयोग पुन्हा सुरू करावा-मनोज संकाये

परळी वैजनाथ, (बातमीदार):- वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याने शहरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. परिणामी, वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वाहतूक कोंडीला काही प्रमाणात का होईना आळा बसवा यासाठी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ.शामाप्रसाद मुखर्जी येथे उभारण्यात आलेले सिग्नल बंद असून, नागरिक सिग्नल बंद असल्याने नियम पाळत नसल्याचे पहावयास मिळत आहे. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिर परिसरातही सिग्नल बसवावेत व पी वन, पी टू पार्किंगचा प्रयोग पुन्हा सुरू करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.मनोज संकाये यांनी केली आहे.



शहरातील अरुंद रस्ते, त्यावर फेरीवाले, छोटे-मोठे व्यावसायिक व वाहन धारकांनी केलेले अतिक्रमण, वाहतूक नियमांची पायमल्ली यामुळे परळी शहरातील वाहतूक समस्या जटील बनली आहे. नागरिक जागा मिळेल तिथे दुचाकी व अन्य वाहने उभी करत आहेत. मोंढा मार्केट, राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक, स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, वैद्यनाथ मंदिर परिसर या भागात रोजच वाहतुकीचा खोळंबा होत आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी शहर वाहतूक शाखेने तात्काळ लक्ष देवून या ठिकाणी वाहतूक सुरळीत करावी अशीही मागणी केली आहे. काही वर्षांपूर्वी शहरात सुरू करण्यात आलेला पी वन, पी टू पार्किंगचा प्रयोग सध्या बंद असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूने दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहत आहेत. विशेषतः बाजारात दुचाकी वाहनांमुळे रस्ता अरुंद होत आहे. शहर वाहतूक शाखेने पाठपुरावा करून वाहतूक सिग्नल पुन्हा सुरू करावेत तसेच शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी नागरिकांनीही वाहतूक नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. ***

# टँकरने पाणी पुरवठ्याबाबत अडचणी आल्यास संपर्क क्रमांकावर तक्रार करावी

बीड, (जि.मा.का.):- सद्यस्थितीत बीड जिल्हयामध्ये पर्जन्यमान कमी पडल्यामुळे अत्यल्प पाणी साठा असल्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात नसल्यामुळे जिल्हयातील ब-याच गावांमध्ये भिषण पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. ज्या गावामध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली त्या गावाचे प्रस्तावास मंजूरी देवून ग्रामस्थांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तेव्हा ज्या गावामध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली आहे अशा गावामध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो परंतु गावामधील ग्रामस्थांना त्यांच्या गावामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याबाबत माहिती होत नाही. ग्रामीण भागामध्ये टँकरने पाणी पुरवठा केल्यास संबंधित गुत्तेदार हा कमी खेपा होतात त्यामुळे ग्रामस्थांना आवश्यक तेवढे पाणी मिळत नाही परिणामी ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते.

ग्रामस्थांना पिण्याचे पाण्याचे टँकर गावामध्ये प्रशासनामार्फत देण्यात आले किंवा कसे तसेच टँकरने पाण्याच्या खेपा कमी होत असल्याबाबत त्या अनुषंगाने ग्रामस्थांच्या तक्रारी असल्याबाबत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई बीड यांचे व्हॉटसॲप क्रमांक ७२७६३२५८९६ व ८६६८३८१४१५ वर तक्रारी नोंद करणे.जेणे करुन टंचाईग्रस्त असलेल्या गावामधील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होणार नाही. ***

(पान २ वरुन)........ **देशातील पहिली निवडणूक**

पराभव झाला. सर्वात मोठा धक्कादायक पराभव होता तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा! बॉम्बे नॉर्थ सेंट्रल जागेवरून बाबासाहेबांचा १५ हजार मतांनी पराभव झाला होता. नारायण सदोबा काजरोळकर या त्यांच्या माजी स्वीय सहाय्यकानेच त्यांचा पराभव केला होता. १९६२ च्या निवडणुकीपर्यंत, लोकसभेचे बहु-सदस्यीय मतदारसंघ होते. भारतीय निवडणूक आयोगाने १४ पक्षांना 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून मान्यता दिली होती आणि ५० हून अधिक पक्षांना 'प्रादेशिक पक्षा'चा दर्जा दिला होता. निवडणुकीनंतर फक्त काँग्रेस, प्रजा समाजवादी पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय जनसंघाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा टिकवून ठेवता आला. पहिली आव्हानात्मक निवडणूक राबवण्यात आलेले यश रामचंद्र गुहा यांनी आपल्या पुस्तकात याविषयी लिहिले आहे की, मानवी इतिहासातील लोकशाहीचा सर्वात मोठा प्रयोग असे वर्णन भारताचे पहिले निवडणूक अधिकारी सेन यांनी केले आहे. इतकी मोठी प्रक्रिया राबवण्यासंदर्भात पंतप्रधान नेहरूंसह अन्य सहकाऱ्यांना असलेल्या शंकांचे निरसन सुकुमार सेन यांनी केले. या निवडणुकीनंतर जवाहरलाल नेहरु म्हणाले होते की, कथित निरक्षर मतदारांविषयीचा माझा आदर दुणावला आहे. भारतातील प्रौढ मताधिकाराविषयी माझ्या मनात असलेल्या सर्व प्रकारच्या शंका आता निघून गेल्या आहेत. दरम्यान, प्रौढ मताधिकार राबवण्यामध्ये आलेले हे निर्विवाद यश आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आणि मोठ्या प्रमाणावर निरक्षरता असतानाही लोकांनी ते करून दाखवले असल्यामुळे त्यांची क्षमता सिद्ध झाली आहे, असे मत मुख्य निवडणूक आयुक्तांनी व्यक्त केले होते. ***

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे इयत्ता दहवी CBSE बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश

परळी (प्रतिनिधी) :- दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांनी परत आपल्या कर्तृत्वाची चुणूक दाखवत सर्व पंचक्रोशित अतुलनिय तसेच प्रशंसनीय असा किर्तीमान २०२३-२०२४ सी.बी.एस.सी.बोर्ड परीक्षेत १०० % निकाल देऊन स्थापित करत, संपूर्ण परिसराला थक्क केले आहे.

या वर्षी एकूण ४३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्यापैकी ४ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. यामध्ये अजिंक्य देशमुख



शाळेत प्रथम येत त्याने ९७.४०% गुण मिळवले आहेत, तर आर्या नावंदरने ९४.८% गुण घेत दुसरा क्रमांक मिळवला आहे, याचबरोबर सोमनाथ मुंडे याने ९०.४% गुण तर तपन शिंदे याने ९०% गुण संपादन करत तिसरा तसेच चौथा क्रमांक मिळवला आहे.

हा उल्लेखनीय आणि प्रशंसनीय निकाल म्हणजे शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि साहजिकच विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे शक्य झाले आहे. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापकीय अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते तसेच आमचे मार्गदर्शक श्री.किरण गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ***

# शूरवीर छत्रपती संभाजी महाराजांबाबत समाजात आकस का?

संभाजी महाराजांच्या मृत्यू नंतर आज शतके उलटली परंतु अजूनही त्यांच्या विरोधी हिरीरीने बोलले जाते. यामागे काय कारण असावे? संभाजी महाराजांची प्रतिभाशक्ती, लेखनशैली, युद्धकौशल्ये, बाणेदारपणा हे सर्वच वाखाणण्याजोगे आहे. असे असतानाही आज समाजात काही प्रमाणात काही विशिष्ट गटांकडून शंभूराजांची प्रतिमा अकारण मलीन केली जाते. मग याची सुरुवात कुठून झाली असावी? आजही शंभूराजांच्या घटने नंतर औरंगजेबाचं कौतुक करण्याचा सपाटाच आपल्याकडे समाज माध्यमांवर सुरु आहे असे दिसते. ही सगळी पार्श्वभूमी लक्षात घेता आज संभाजी महाराजांच्या जन्मदिनी या सोशल मीडिया गप्पांच्या मागे असलेले धाराप्रवाह मला शोधायला आवडतील.

मल्हार रामराव चिटणीस यांनी शंभू राजांच्या मृत्यू नंतर एक बखर लिहिली, किती? तब्बल १२२ वर्षांनी. आपले पूर्वज बाळाजी आवजी आणि त्यांचे पुत्र आवजी बाळाजी यांना हत्तीच्या पायदळी तुडवून मारल्याचा राग या चिटणीसांच्या मनात होता. या सूड बुद्धीने त्यांनी एकांगी बखरचे लेखन केले. या बखरी पासून शंभू राजांची प्रतिमा मलिन व्हायला सुरुवात झाली अशी एक शक्यता सुप्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांनी त्यांच्या संभाजी कादंबरी मागच्या टिपणात मांडली आहे. त्यानंतर आपण येतो रियासतकार सरदेसाई यांच्याकडे. खरेतर त्यांच्या प्रामाणिक लेखनावर कोणताही संशय घेण्याचे कारण नाही. परंतु ज्या साधनांचा आधार इतिहास पुनर्लिखित करताना घेतला जातो ती साधने जर अव्यवस्थित असतील तर पुढची घडी नेमकी कशी पडावी? बरं आता आपण हा सगळा लिखित इतिहास मागे ठेऊ आणि कागद पत्रांकडे येऊ. अगदी राजगडावरच्या कैदेचेच घ्या. ज्या नजर कैदेबद्दल चवीने सांगितले जाते त्याविषयी एकही कागदपत्र उपलब्ध नाही. कुरुंदकरांनी मात्र पुढे आश्वासक इतिहास मांडायला सुरुवात केली. ही नवी वाट दिसू लागल्या नंतर मात्र अनेक इतिहासकारांनी हा विषय पुन्हा पुन्हा मांडायला सुरुवात केली. श्रीमान योगींच्या प्रस्तावनेत नरहर कुरुंदकरांनी संभाजीची व्यथा मांडली आणि त्यानंतर पागडी यांनीही या नव्या माहितीस दुजोरा दिला. संभाजी महाराजांच्या बदफैलीपणाबद्दलचा पहिला उच्चार १६९० नंतर झाला. शंभूराजांच्या मृत्यू नंतर. याचाच अर्थ असा लावता येतो, संभू राजांच्या सडेतोड वागण्याने आणि सत्यप्रियतेने दुखावलेगेलेले काही दरबारी किंवा त्यांचे वंशज यांनी केवळ बदनामीसाठी अशा अफवा पसरवल्या असण्याची शक्यता सर्वाधिक आहे. विश्वास पाटील



संभाजीच्या परिशिष्टत लिहितात, संभाजी राजांच्या अन्नात वारंवार विषप्रयोग केला गेला. परंतु या हल्लेखोरांवर राजांनी वारंवार दया दाखवून व स्पष्ट समाज देऊनही हाच प्रयत्न पुन्हा केला गेला. त्यावेळी संबंधितांना शिक्षा देणे अनिवार्य होते. या शिक्षेचा मोबदला म्हणून संबंधितांच्या वंशजांनी महाराष्ट्राच्या माथी मारलेले शंभूराजांचे खोटे चरित्र. ३ एप्रिल १६८० ला शिवाजी महाराजांच्या मृत्यू नंतर स्वराज्यावर मोठं संकट आलं होतं. जवळ जवळ ५ लाखाची फौज घेऊन औरंगजेब चालून आला. त्यावेळी पुढील १० वर्षे महाराष्ट्र एकहाती सांभाळण्याचे काम छत्रपती संभाजी महाराजांनीच केले. ते सांभाळताना औरंगजेब सारख्या दुष्टाशी लढून पुन्हा हौतात्म्य पत्करणारा राजा म्हणून त्यांच्या बद्दल एक आपलेपणा आहे, प्रेम आहे. आणि म्हणूनच त्यांची ओढ महाराष्ट्राला अजूनही वाटते.

औरंगजेब बद्दल मात्र लोकांच्या मनात एवढे प्रेम कोठून येते कळायला मार्ग नाही.

काही क्रूर प्रवृत्तीच्या लोकांनी असा सपाटा चालवलेलाच आहे. मुळात औरंगजेब हा दुष्टाचा शेहेनशाह होता असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. ज्यांनी आपला पिता शहाजहान याचे पाणी तोडले, आपला मोठा भाऊ दाराचे मुंडके छाटून आपल्या हात घेऊन बराचवेळ पारखत बसला होता. आपल्या तीन भावांची त्याने निर्घृण हत्या केली. दाराच्या दोन बेगमांशी सुद्धा त्याने जुलमाने लग्न केले. त्याचा हा सर्व इतिहास पाहता त्याला हिरो करायचे काहीही कारण नाही. तो दुष्ट होता, क्रूरकर्मा होता हे त्याने त्याच्या कर्मानेच जाहीर केले. आणखी एक, जर लोकांना हिंदू आणि मुसलमान बंधुत्वाची किंवा ऐक्याची प्रतीकं हवी असतील, तर ती अनेक आहेत. त्यांच्याकडे आपण पाहत नाही आणि या दुष्टांनाच सुष्ट ठरवत जातो. असे अनेक सरदार होते.

अफजलखानाचेही आणि औरंगजेबाचेही काही सरदार शिवाजी राजांना, शंभूराजांना सामील होते. काही उघडही सामील होते. त्यांनी बरीच मदत केली आहे. ते जरी मुसलमान असले तरीही ते हिंदवी स्वराज्याचे मित्र होते. त्यांच्या मैत्रीचा सन्मान जरूर केला जावा. परंतु मुद्दामहून अफजलखान किंवा औरंगजेबाचा गौरव करण्यामागे अर्थ नाही. जसे की रुस्तम-ए-जमा आहे, हा विजापूरचा सरदार होता. त्याचे वडील रणदुल्ला खान म्हणजे साताऱ्या जवळील रेहमतपूर येथील. रेहमतपूर त्यांच्या नावाने बांधलेले आहे. या रणदुल्ला खानाने शिवाजी राजांचे पिता शहाजीराजांना खूप मदत केली. बंगळुरू जवळचा किल्ला त्यांना राहायला दिला. हा किल्ला इतका मोठा होता की त्याला दिल्ली दरवाजा सारखे नऊ दरवाजे होते. तिथल्याच एका केम्पेगौडा नावाच्या राजाकडून ६० हजार फौजेनिशी वर्षभर लढाई करून जिंकलेला तो किल्ला होता. तो जसाच्या तसा शहाजी राजांकडे त्यांनी सुपूर्द केला. पुढच्या काळात शिवाजी महाराजांची मैत्री त्यामुळे जुळलेली आहेच. डिसेंबर १६५९ साली झालेल्या लढाईत शिवाजी राजांनी रुस्तम-ए-जमा ला जाऊ दिले. याची वर्णने शिवभारतात देखील आहेत. पण हे सोडल्यास शंभूराजांचा इतिहास जाज्वल्यच आहे. तो बखरींतून वाचण्यापेक्षा आता कादंबऱ्यांतूनच वाचायला हवा.

**- मृगा वर्तक**

- संकलन : मिलिंद पंडित, कल्याण